कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/म.रं.दि/२०२५–२६/१८३५
दि. ०३/११/२०२५

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी गोव तर्फे बुधवार दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं ५.०० वाजता कला अकादमीच्या कृष्ण कक्षात मराठी रंगभूमी दिन साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी गोवा विधानसभेचे मान. सभापती, श्री. गणेश गांवकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून कला अकादमीचे अध्यक्ष, श्री. चंद्रकांत कवळेकर समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. तर प्रतिभावंत रंगकर्मी डॉ. प्रसाद गुरव यांची खास निमंत्रीत म्हणून उपस्थिती या प्रसंगी लाभणार आहे. या समारंभाला जोडून गोवा केंद्रावरुन निवडलेल्या संस्थांनी महाराष्ट्र राज्य अंतिम नाटयस्पर्धेत सलग तीन वर्षे प्रथम पुरस्कार प्राप्त केलेल्या रसरंग, उगवे–पेडणे, मांगिरीश युथ क्लब, मंगेशी–फोंडा व रुद्रेश्वर, पणजी या संस्थांचा व कलाकारांचा सन्मान प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात येणार आहे.

तद्नंतर अंतिम स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त नाटयप्रयोगांच्या दिग्दर्शकांची मुलाखत डॉ. साईश देशपांडे घेणार आहेत. यात, निलेश महाले, दक्षा शिरोडकर व गंगाराम उर्फ सतीश नार्वेकर यांचा सहभाग राहिल.

नाटयप्रेमी रसिकांनी, नाटयविद्यार्थ्यांनी व कलाकारांनी उपस्थित राहून या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन कला अकादमीतर्फे करण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)